# प्रताप महाविद्यालय (स्वायत्त)
# मराठी विभाग
# शैक्षणिक वर्ष २०२३ - २०२४
# ९७ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन

- **साहित्यिक मुलाखती अहवाल**

९७ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने मराठी विभागाच्या वतीने निवडक प्रसिद्ध साहित्यिकांच्या मुलाखती घेण्याचा एक स्वतंत्र व शैक्षणिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात आला. हा उपक्रम दि. ०२ ते ०४ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत अमळनेर येथे पार पडला.

या मुलाखत उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष साहित्यिकांशी संवाद साधण्याची संधी उपलब्ध करून देणे, त्यांच्या लेखनप्रक्रियेची माहिती मिळवणे तसेच समकालीन मराठी साहित्याचे वैचारिक प्रवाह समजून घेणे हा होता. या मुलाखत समितीचे सह-समन्वयक म्हणून मराठी विभागाचे प्रा. योगेश पाटील यांनी जबाबदारी सांभाळली.

डॉ. रमेश माने, प्रा. ज्ञानेश्वर कांबळे, प्रा. योगेश पाटील, डॉ. विलास गावीत तसेच मराठी विभागातील विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी प्रश्न मांडणी, संवाद, ध्वनिमुद्रण व व्यवस्थापन अशा विविध जबाबदाऱ्या पार पाडल्या. मुलाखतींच्या माध्यमातून साहित्यिकांचे वैचारिक योगदान, सामाजिक भान, लेखनप्रक्रिया, साहित्याची भूमिका आणि भविष्यातील दिशा यावर सखोल चर्चा झाली.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या संवादकौशल्यात, आत्मविश्वासात व चिकित्सक विचारक्षमतेत लक्षणीय वाढ झाली. अभ्यासक्रमातील साहित्य प्रत्यक्ष लेखकांच्या अनुभवांशी जोडले गेल्यामुळे अध्ययन अधिक प्रभावी व अर्थपूर्ण ठरले.

साहित्यिक मुलाखतींचा हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी अत्यंत प्रेरणादायी ठरला. मराठी साहित्याची प्रत्यक्ष अनुभूती देणारा हा उपक्रम विभागाच्या शैक्षणिक उपक्रमांमध्ये विशेष महत्त्वाचा ठरला.




**प्रसिद्ध कवी राजेंद्र कांबळे यांची मुलाखत घेताना मराठी विभागातील विद्यार्थी**




**प्रसिद्ध समीक्षक डॉ. फुला बागूल यांची मुलाखत घेताना मराठी विभागातील विद्यार्थी**

डॉ. रमेश माने

प्रमुख- मराठी विभाग, प्रताप महाविद्यालय, (स्वायत्त) अमळनेर.